प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd /cidco CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि.** ३१.१०.२०२२

**सिडकोमध्ये ३१ ऑक्टोबर २०२२ ते ६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन**

केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशांनुसार दरवर्षीप्रमाणे सिडको महामंडळामध्ये ३१ ऑक्टोबर २०२२ ते ०६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सिडको मुख्यालयासह सिडकोची नोड्‌ल कार्यालये, नवीन शहर कार्यालये येथे हा सप्ताह राबविण्यात येणार आहे. "भ्रष्टाचार मुक्त भारत - विकसित भारत" (Corruption free India for a developed nation) ही या वर्षीच्या दक्षता जनजागृती सप्ताहाची संकल्पना आहे.

सिडको महामंडळामध्येही दक्षता जनजागृती सप्ताहा दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको** यांनी ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी सिडको भवन येथे उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सत्यनिष्ठेची शपथ दिली. तसेच या प्रसंगी उपस्थितांना मा. राज्यपाल आणि मा. मुख्यमंत्री यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त दिलेले संदेश वाचून दाखविण्यात आले. सिडको सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास **श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. शशीकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी, श्री. विनोद पाटील, अध्यक्ष, सिडको एम्प्लॉईज युनियन, विभागप्रमुख व अधिकारी** मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय दक्षता आयोगातर्फे भ्रष्टाचारविरोधी जागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनानुसार देशभरातील शासकीय व निमशासकीय संस्था आणि कार्यालयांमध्येही या सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. अधिकारी व कर्मचारी वर्ग, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी; समाजाच्या अशा विविध स्तरांतील घटकांमध्ये भ्रष्टाचारविरोधी जागृती निर्माण होऊन भ्रष्टाचाराचे निर्मूलन व्हावे, या उद्देशाने दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार दक्षता जनजागृती सप्ताहामध्ये विविध कार्यशाळा, निंबध स्पर्धा, भित्तीपत्रकाचे प्रदर्शनसारखे विविध जागृतीपर कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको